# सचित्र

१५५७
म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. नं. २०८

किंमत १० आणे



REFBK-0007796

# सज्जनगड

प्रकाशक : समर्थ सेवा मंडळ सज्जनगड पो. परळी (जि. सातारा)

REFBK-0007796

श्रीराम समर्थ

# सचित्र सज्जनगड.

सज्जनगड म्हणजेच सद्गुरु श्रीसमर्थ रामदास स्वामी महाराज यांच्या समाधीचें पुण्यस्थान होय. पारतंत्र्यांतून स्वातंत्र्याप्रत नेणाऱ्या महाराष्ट्रीय देशभक्तांचें हें स्फूर्तीस्थान होतें व आहे. संसारांत राहून ईश्वर प्राप्ती कशी करतां येते यांची सांगड समर्थांनीं उत्तम घातलेली आहे. महाराष्ट्रांतील आबालवृद्धांना या स्थानाबद्दल आपलेपणा आहे. श्री समर्थ शके १५९८ पासून १६०३ पर्यंत गडावर होते. या काळांतील कांहीं प्रसंग व गडाचा पूर्वइतिहास खाली देत आहोंत.

## पूर्व इतिहास

सह्याद्रि गिरिचा विभाग विलसे मंदार शृंगापरी ।
नामें सज्जन जो नृपें वसविला श्री उर्वशीचे तिरीं ।।
साकेताधिपती कपी भगवती हे देव ज्याचे शिरीं ।
तेथें जागृत **रामदास** विलसे जो या जना उद्धरी ॥

*—अनंत कवि*

श्रीसज्जनगड साताऱ्याचे नैऋत्य दिशेस ६ मैलावर आहे.

हा गड शिलाहार कालीन असावा. आदिलशाही काळांत तो आदिलशहाकडे होता. सन१६६२मधील एका पत्रांत अफजलखानाचा पुत्र फाजलखान तेथें किल्लेदार असल्याचा उल्लेख आहे. किल्ल्यांत प्रवेश करण्याच्या दोनपैकीं आंतील महाद्वारावर पूर्वाभिमुखी एक, व या महाद्वारांतून आंत गेल्यावर थोडें तोंड फिरवून पुढील पायऱ्या चढूं लागतांच आंतील कोपऱ्यांत दक्षिणाभिमुखी एक, असे दोन


## पुष्पवाटिका




समर्थांची ब्रह्मपिसा वृत्तीतील उडी




## वेताळ



कल्याणांची छाटीसाठी उडी



REFBK-0007796

श्रीराम समर्थ

# सचित्र सज्जनगड.

क्रमांक ... २०८ ... नों: दि: २३।८।

सज्जनगड म्हणजेच सद्गुरु श्रीसमर्थ रामदास स्वामी महाराज यांच्या समाधीचें पुण्यस्थान होय. पारतंत्र्यांतून स्वातंत्र्याप्रत नेणाऱ्या महाराष्ट्रीय देशभक्तांचें हें स्फूर्तिस्थान होतें व आहे. संसारांत राहून ईश्वर प्राप्ती कशी करतां येते यांची सांगड समर्थांनीं उत्तम घातलेली आहे. महाराष्ट्रांतील आबालवृद्धांना या स्थानाबद्दल आपलेपणा आहे. श्री समर्थ शके १५९८ पासून १६०३ पर्यंत गडावर होते. या काळांतील कांहीं प्रसंग व गडाचा पूर्वइतिहास खाली देत आहोंत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ७७९६

## पूर्व इतिहास

सह्याद्रि गिरिचा विभाग विलसे मंदार शृंगापरी ।
नामें सज्जन जो नृपें वसविला श्री उर्वशीचे तिरीं ।
साकेताधिपती कपी भगवती हे देव ज्याचे शिरीं ।
तेथें जागृत **रामदास** विलसे जो या जना उद्धरी ॥

—*अनंत कवि*

श्रीसज्जनगड साताऱ्याचे नैऋत्य दिशेस ६ मैलावर आहे.

हा गड शिलाहार कालीन असावा. आदिलशाही काळांत तो आदिलशहाकडे होता. सन १६६२ मधील एका पत्रांत अफजलखानाचा पुत्र फाजलखान तेथें किल्लेदार असल्याचा उल्लेख आहे. किल्ल्यांत प्रवेश करण्याच्या दोनपैकीं आंतील महाद्वारावर पूर्वाभिमुखी एक, व या महाद्वारांतून आंत गेल्यावर थोडें तोंड फिरवून पुढील पायऱ्या चढूं लागतांच आंतील कोपऱ्यांत दक्षिणाभिमुखी एक, असे दोन

शिलालेख आहेत, ते आदिलखानशाहीमधील रेहान यांचे नांवचे असून त्यांजवर सन नाहींत. महंमद आदिलशहा ( १६२७ ते १६५६ ) याचे कालांत दोन रेहान झाले, एक मलिक व दुसरा सिद्दी. दोघेही पराक्रमी असून मलिक रेहान यास मदार–उल–महाम ही पदवी होती.

महाद्वाराचे आंतील बाजूस दक्षिणाभिमुखी असलेल्या लेखाचा अर्थ भा. इ. सं. मं. क्यूरेटर श्री. खरे यांनी दिलेला आहे तो असा.

१ ऐश्वर्य तुझ्या दारांतून तोंड दाखवीत आहे.

२ हिंमत त्याच्या ( रेहानच्या ) कामामुळें सर्व फुलांना प्रफुल्लित करीत आहे.

३ तूं विवंचना दूर होण्याचे स्थान युक्त आहेस, परंतु पुन्हां विवंचना युक्त आहेस.

४ तुझ्यापासून सर्व विवंचना दूर होतात.

१ अश्वलायनगड २ अस्वलगड ३ परळीगड ४ सज्जन–गड ५ नवरस तारा हीं पांच नांवें या किल्ल्यास निरनिराळ्या वेळीं मिळालीं आहेत. ही आश्वलायन ऋषींची जागा म्हणून दंतकथा आहे, त्यावरून पहिले नांव पडलें असावें. ‘ आश्वलायन ’ या संस्कृत नांवाचें अपभ्रष्टरूप अस्वल होऊन किंवा रानांत कधीं काळीं अस्वलें फार असलीं तर त्यावरून दुसरें नांव मिळालें असावें. परळी गांवचें हद्दीत हा किल्ला असल्यामुळें तिसरें नांव मिळालें आहे. श्रीसमर्थ येथें राहूं लागल्यापासून संत–सज्जन येथें येऊं जाऊं लागले म्हणून शिवाजी महाराजांनीं ‘ सज्जनगड ’ हे नांव दिलें.


औरंगजेब बादशहानें हा किल्ला १७०० मध्यें मराठ्याकडून जिंकून घेतला तेव्हां त्यानें या किल्ल्यास पांचवें नांव दिलें.

अनुक्रम २०४०९ वि.
श्री समर्थ स्थापित २०८ नों: दि:




श्री आंग्लाई देवी

श्री आंग्लाईचें देवळांत




श्री समर्थांची बसण्याची जागा

श्री राम व श्री समर्थ मंदीर



## गड श्री शिवरायांचे ताब्यांत

शके १५९५ चैत्र वद्य १० भौम वासरीं ता. २ एप्रिल सन १६७३ रोजीं अस्वलगड विजापूरकरांच्या ताब्यांतून घेतला. परळी हें मोठे नाक्याचें व मोर्चाचें ठिकाण. गडाभोवताच्या सर्व खोऱ्याचें तें नाक. येथून पश्चिमेस खेड चिपळूणाकडे, उत्तरेस महाबळेश्वर, प्रतापगड, रायगड वगैरेकडे, दक्षिणेस कळंब्याचे घळींत व चाफळकडे जाण्यास जवळचे मार्ग, ईशान्येस सहा मैलावर साताराचा किल्ला. तसेच नैऋत्य दिशेस चार पांच मैलावर ४००० माणसे बसतील अशी मोरघळ. ही सज्जनगडाची भौगोलिक परिस्थिती व आपणास समर्थ दर्शन वरचेवर होणें सोयीचे वाटल्यावरून श्रीशिवरायांनीं श्रीसमर्थांना या गडावर राहणेची विनंती केली.

## शक १५९८ श्रीसमर्थ गडावर आले

ती मान्य करून समर्थांची स्वारी चाफळहून मोठ्या समारंभानें निघाली. श्रीसमर्थ हत्तीवर विराजमान झाले आणि कल्याणस्वामी त्या हत्तीचे माहुत झाले. गडावर आल्यावर श्रीसमर्थ आदि मंडळींचा मुक्काम पूर्वीच्या प्रशस्त असलेल्या ओवऱ्यांतच झाला. देवतेचे अधिष्ठान पाहिजे म्हणून समर्थांनीं अंगापुराचे डोहातून काढलेली आंग्लाईची मूर्ती चाफळास ठेवली होती ती आणून तिची प्राणप्रतिष्ठा गडावर केली. या प्रसंगीं श्रीशिवरायांनीं महाराष्ट्रांतील सर्व संत–सज्जनांस आमंत्रण करून मोठा सोहाळा केला व गडाचे नांव

## संतपरिषद व गडाचे नांव सज्जनगड

'सज्जनगड' ठेवलें व आपले हातानें भगवा झेंडा उभारला. (झेंडा चित्र दुसरीकडे आहे ) या संत परिषदेचा सोहाळा पाहण्यास हजारो लोक जमले होते. हा सोहाळा एक महिना चालू होता. श्रीशिवाजी महाराजांचा

लक्ष भोजनाचा संकल्प त्यांनीं या वेळींच पुरा केला. वामन, जयराम, रंगनाथ, वेणु, आक्का आदि अनेकांची कीर्तनें झालीं व स्वतः खुद्द श्रीशिवाजी महाराजांना समर्थांनीं सांगितल्यावरून त्यांनीही कीर्तन केलें. अखेरचें कीर्तन श्रीसमर्थांनीं केले. याच परिषदेत गागाभट्ट समर्थांस शरण आले.

सज्जनगडावर श्रीसमर्थ राहूं लागल्यानंतर श्रीशिवराय अनेक-वेळां तेथें येत जात. राज्याभिषेकानंतर सर्व कुटुंबासह श्रीशिवराय येथें श्रीसमर्थांजवळ दीड महिना राहून रायगडास परत गेले. कर्नाटक स्वारी करून आलेवरही येथें राहिले होते व अखेर अवतार समाप्तीचे अगोदर शके १६०१ पौष शु. ९ ते माघ शु. १५ पर्यंत येथें राहून ते शेवटचा निरोप घेऊन रायगडीं परत गेले.


सज्जनगडावर श्रीसमर्थांजवळ श्रीशंभु महाराजास श्रीशिव-रायांनीं कांहीं दिवस ठेवले होते. श्रीशिवरायांचे निधनानंतर श्रीशंभू छत्रपति व रामचंद्र नीलकंठ अमात्य हे येथें येऊन श्रीसमर्थ दर्शन घेऊन आशीर्वाद घेऊन रायगडास गेले.

## समर्थांचे निर्याण

दुर्मती नाम संवत्सरीं शके १६०३ मध्यें सज्जनगडीं इमारत झाली तिच्या खर्चास राजानें दोन हजार निष्क म्हणजे होन खर्च केले. याच वर्षी वैशाख मासीं राजांनीं बांधून दिलेल्या नूतन विशाल गृहांत श्रीसमर्थांनीं प्रवेश केला. ‘ मठ ’ म्हणून येथें समजली जाते ती हीच इमारत होय. माघ वद्य ९ शके १६०३ शनिवारी दुपारी ( ता. २२ जानेवारी सन १६८२ दोनप्रहरीं श्रीसमर्थ परधामीं गेले ते याच मठांतीतील शेजघरांत. ) समर्थ पलंगाखालीं उतरले. व उत्तरेकडे तोंड करून बसले. शिष्य मंडळी पलंगावर बसा असा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २०४०९ वि:
क्रमांक २०८ नों: दि:

श्रीराम



शेजघर



आग्रह करू लागली. तेव्हां समर्थ उचला असे म्हणाले परंतु ८।१० जणाना सुद्धा ते उचलेनात. सर्वांस खोलीबाहेर जाण्यास सांगितले. उद्धव व आक्का दोघे आंत राहिले. समर्थ आतां जाणार असे वाटल्यावर शिष्य मंडळींचे डोळे पाण्यानी भरले तेव्हां समर्थ म्हणाले—

माझी काया आणि वाणी। गेली म्हणाल अंतःकरणीं।
परि मी आहे जगज्जीवनीं। निरंतर॥
आत्माराम दासबोध। माझे स्वरूप स्वतः सिद्ध।
असतां न करावा खेद। भक्त जनीं॥

हें सांगितल्यावर समर्थांनीं तीन वेळ रामनामाचा एवढा मोठ्याने गजर केला कीं तो सर्व गडावर दुमदुमला. आवाज संपला व अवतार ही संपला. मठाचे बाजूस खडूडा होता तेथेंच समर्थांचें दहन करण्यात आलें. क्रिया उद्धवानी केली व अस्थी चाफळ येथें वृंदावन करून ठेवल्या.

श्रीसमर्थ ईशपदीं लीन झाल्याची बातमी समजतांच श्रीशंभू छत्रपति व रामचंद्र नीलकंठ आमात्य सज्जनगडावर आले. रामचंद्र पंतास गडावर समाधि व देवालय बांधण्यास सांगून श्री शंभू छत्रपति रायगडीं गेले. रामचंद्र पंतांनीं राजांचे आज्ञेप्रमाणें श्रीसमर्थांचे दहनभूमीवर समाधि व देऊळ पावणेदोन महिन्यांत बांधले.

श्री शंभूरायाचा तुळापूर येथें शके १६१० मध्यें शोकजनक अंत झाल्यावर रायगडास वेढा पडला होता. श्री राजाराम छत्रपति त्यांतून निसटून ( शके १६११ मध्यें ) सज्जनगडीं येऊन कांहीं दिवस राहिले होते. त्यांनीं समर्थांना आळवून आशीर्वाद घेतला. नंतर ते पन्हाळ्यास व तेथून पुढें जिंजीकडे गेले.

ता. २१ एप्रिल सन १७०० रोजीं साताराचा किल्ला औरंगजेबानें घेतला व लगेच त्याच दिवशीं त्यानें आपले सरदारास सज्जनगडास वेढा घालणेस पाठविले. ता. २१-४-१७०० ते १५-६-१७०० पर्यंत वेढ्यामुळें किल्ला तंग झाला होता. सज्जनगडावर त्यावेळचा खंदा मराठावीर रणझुंजार परशुराम त्र्यंबक हा किल्याच्या रक्षणाकरितां कसून प्रयत्न करीत होता. सातारा किल्यास वेढा पडला असतां तेथील किल्लेदार प्रयागजी प्रभू यास परशुराम त्र्यंबकनें सज्जनगडावरून वेळोवेळीं अन्नसामुग्री पुरविली होती. बादशहा ता. ३०-४-१७०० रोजीं परळीस मुक्कामास आला व स्वतः त्याचे नेतृत्वाखालीं गडाचें पहिलें महाद्वारावर त्यानें हल्ला चढविला. महाद्वाराचें आंतील बाजूस पुढें झुकून आलेले प्रचंड खडकावर मोंगल सैन्यानें सुलतान दवा (निकाराचा हल्ला, grand assault) जिवावर उदार होऊन चढविला. पण तो निकराचा हल्ला भिकाजी जाधव व गोविंद महादेव गोडबोले या दोन सरदारांनीं महापराक्रमानें परतून लावला. या सरदारांवर किल्याचें रक्षणाचें काम सोपवून परशुराम त्र्यंबक श्रीरामाच्या चलित मूर्ति घेऊन उद्धव गोसाव्यासह वासोट्यास गेले व जातांना श्रीसमर्थ समाधीचें द्वारही त्यांनीं बेमालूम चिणून तेथें एक श्री मारुतीची मूर्ती ठेवली. किल्ल्यावरील शिबंदी तुफान लढली. मुख्य दरवाजावर भयंकर रणकंदन झालें. रक्ताचा खच पडला. तटातटाचे खडकास शत्रु बिलगला असतां वरून मराठ्यांनीं लांडगेतोड केली. मोंगलही बेसुमार लढले. पण गडावरील अन्नसामग्री संपल्यामुळें अखेर रामचंद्र नीलकंठ आमात्य यांच्या आज्ञेनें बादशहाकडून मोठी रक्कम घेऊन किल्ला सोडावा लागला. नंतर बादशहा औरंगजेब सज्जनगडावर आला व त्यानें

किल्ल्याचें नांव ‘ नवरसतारा ’ असें ठेवलें. श्रीरामाचें मंदिर जमीन दोस्त केलें. समाधि मात्र हातीं लागली नाहीं त्यामुळें बचावली.

जूनचा महिना असून पाऊस भयंकर सुरू झाला होता. त्यामुळें बादशाही फौजेचे फार हाल झाले. ता. २१।६।१७०० रोजीं ( शके १६२२ ) बादशहा परळीहून भूषणगडास जाणेंस निघाला असतां उर्मोडी नदींत बादशहाचे कांहीं सैन्य वाहून गेले. बादशहानें तोंड फिरवतांच रणझुंजार परशुराम त्र्यंबकनें गड परत घेऊन तेथें (मंदिर बांधून) श्रीरामाच्या मूर्तीची पुनश्च स्थापना केली.

श्री शाहू छत्रपति, बाळाजी आवजी, खंडो बल्लाळ, शंकराजी नारायण, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, कल्याण स्वामी, उद्धव स्वामी, भीमस्वामी, दत्तात्रय स्वामी, पारिपत्याधिकारी दिवाकर गोसावी, अनंतदास इत्यादि अनेक वीर मुत्सद्दी व संत मंडळीही येथें येऊन राहून गेली आहेत. हें त्यांचें माहेरघर होतें. येथूनच त्याकालीं राष्ट्रास स्फूर्ति व चैतन्य मिळालें.

समर्थानंतर चाफळ व सज्जनगडची व्यवस्था श्री अक्काबाईनी ३२ वर्षे पाहिली व समर्थांचे बंधुचे वंशातील श्री गंगाधर स्वामीस आणून त्यांचेकडून कारभार करवून घेतला. आक्कानी शके १६४३ कार्तिक शु. १ पदेस देह ठेवला यांची वृंदावन देवळासमोर आहे. संभाजी महाराज यांचे कारकीर्दीनंतर जी वाईट परिस्थिती महाराष्ट्रांत आली तिला श्री अक्काबाईनें फारच कौशल्यानें व धैर्यानें तोंड दिलें. या बाई फार कर्तृत्ववान होत्या. ( वृंदावन चित्र दुसरीकडे आहे )

## गडावरील स्थळे, आख्यायिका व अनुभव

गडाचे दुसऱ्या दरवाज्यांतून आंत शिरलें कीं बरेच वर गेलेवर डावे हातास एक शेंदूर लावलेला मोठा दगड आहे. ज्या अनेक

लढाया या गडाबाबत झाल्या त्यावेळीं दरवाजांत हा किल्ला लढ-विताना अनेकांचे प्राण गेले आहेत. अनेक अतृप्त आत्मे येथें लयास गेले असल्यामुळें कोणा तरी महापुरुषानें याचे शांतीसाठीं एका दग-डाची स्थापना केलेली असून तो लोकाना समजावा म्हणून त्याला शेंदूर लावलेला आहे. या स्मृतीचे दगडावर पाणी घालताना श्री. श्रीधरस्वामींना लोकांनीं पाहिले आहे.

पायऱ्या चढून वर गेल्यावर उजव्या हातास दोन कबरी आहेत. समर्थांचे शिष्यत्व पत्करून हे दोन मुसलमान राहिले होते. त्यांचा अंत समर्थांचे देखतच झाला. त्यांच्या या कबरी आहेत.

या कबरीचे पुढें गेले कीं एक चांगलें बांधलेलें तळें आहे याला मुक्काम तळें म्हणतात. याची बांधणी श्री. गोवर्धनदास यानी केलेली आहे हे पाणी वापरण्यास घेतात.

डाव्या हातास आंग्लाईचे देवळाकडे जाणेस वाट आहे. त्या वाटेने जाताना उजव्या हातास एक पडकी (१) मशीद आहे. त्यांचे पुढें (२) वेताळांचा दरबार आहे व डावे हातास पूर्वाभिमुख (३) श्री. आंग्लाई देवीचें देऊळ आहे.

## श्री वेताळेश्वर

वेताळांचा दरबार म्हणून एक मोठा दगड शेंदूर लाव-लेला आहे. व त्याचे समोर व उजवे डावे हातास लहान लहान दगड शेंदूर लावलेले आहेत. दरसाल दसऱ्यास श्री वेताळ महाराजास आंग्लाईकडें पालखी जाते तेव्हां नारळ ओवाळून टाकणेंचा मान आहे.

या वेताळेश्वराची प्रत्यक्ष प्रचीती आलेले गृहस्थ रा. य. न. आठवले कॉंट्रॅक्टर पुणें हकीगत सांगतात ती अशी:—

## भंडारा काढून दिला

एका कार्तिकी पौर्णिमेस मी माझे स्नेही रा. गजाननराव जोशी [वाईकर] व पुण्याचे मुके पगडबंद रा. गडबोले असे गडावर आलों. पौर्णिमेस उत्तम चांदणें होतें. गडावर समाधि दर्शन घेऊन आंग्लाईचें दर्शनास आम्ही गेलो. देवीचें दर्शन घेऊन बाहेर पडलो व प्रदक्षिणेसाठी निघालो तों रा. गजाननराव एकदम ओरडूं लागले, घुमूं लागले व धावत जाऊन वेताळेश्वराचे दगडास त्यानी मिठी मारली. रा. गडबोले हे मुके असलेमुळें काय झालें हें त्यांना समजलें नाहीं व ते घाबरून बाजूस पळाले. मीही प्रथम जरा घाबरलो पण लगेंच लक्षांत आलें तेव्हां तुम्ही कोण येथें कां असा प्रश्न मी अंगात आलेल्या जोशाना केला. तेव्हा ते 'मी वेताळ आहे. मला समर्थांनी येथें रक्षणासाठी ठेवलेले आहे. माझी स्वारी वरचेवर येते,' असें म्हणाले, तेव्हां मी त्याना विचारलें " तुम्ही वेताळ म्हणता तर कांहीं भंडारा देता कां ? असेल तर द्या." त्यावर त्यानी खालील जमीनीवरील दोन तीन ओंझळी माती माझे हातात टाकली. तो भंडारा अत्यंत सुवासिक पिवळा धमक होता. मी तो अनेकाना या **घटने नंतर दिलाही** होता. तुला कांहीं त्रास होणार नाहीं तूं भाग्यवान आहेत असें मला ते म्हणाले. जरा वेळाने रा. गजाननराव हे शुद्धीवर आले. असा चमत्कार झालेला आहे.

४।५ वर्षांपूर्वीची गोष्ट, श्री. श्रीधर स्वामी हे हिमाल्यांतील यात्रेला निघाले तेव्हां त्यानीं आंग्लाईचें दर्शन घेतलें व दिनकरबुवा रामदासी यांना कमंडलूतून पाणी आणणेस सांगितलें व या वेताळेश्वराचे दगडावर सतत पाण्याची धार धरून 'सर्वांचे रक्षण कर. कोणास त्रास

देऊ नको गडावर कांही कार्य करीत आहेत त्याना त्रास देऊं नको..........' असें म्हणून कमंडलूतील सर्व पाणी त्यानी वेताळेश्वरास घातलें.

## देवळांतून समर्थ गुप्त झाले

आंग्लाईचें देऊळ हेंच एक प्रमुख देऊळ समर्थांचे हातचें होते. समर्थ येथें नेहमीं बसत असत. ज्या जागेवर ते बसत तेथें हल्लीं ओटा केलेला आहे. (त्याचें चित्र दुसरीकडे दिले आहे.) श्री छत्रपती शिवाजी महाराज व समर्थ यांच्या गाठी भेटी, खलबतें या देवळांत होत असत. देवळासमोरील बुरजावर दोघे बसत. सायंकाळीं तेथून सातारा तें थेट नागठाणे वगैरे भाग दृष्टीस पडतो. ही देवीची मूर्ती समर्थांना अंगापुरचे डोहांत [ चाफळचे रामाचे मूर्ती बरोबरच ] सापडली असलेमुळें या देवीस आंग्लाई देवी असें संबोधण्यात येते. समर्थांनीं स्थापन केलेल्या या देवीला महत्त्व असणे अगदी स्वाभाविक आहे. एक गोष्ट अशी सांगतात कीं समर्थांचे मातोश्रींचे अखेरचे आजारपणी ' समर्थ ' सज्जनगडावर होते. त्यांना मातोश्रींचे आजारपणाची बातमी अंतरज्ञानानें समजल्याबरोबर त्यानीं या देवालयाचें दार आंतून लावून घेतलें व अमके दिवशी दार उघडा असें सांगितले. उघडून पहातात तों स्वामीनी क्षौर केला होता. हें काय? म्हणून विचारतां स्वामी म्हणाले " मातोश्री जांबेस निवर्तल्या त्यांचे दिवस करून आलो."

## देवीचे डोक्यावर नाग

अगदी अलिकडील गोष्ट. आंग्लाईचें देवळांत देवीचे डोक्यावर नाग बसला होता. गुरव पूजेस गेला कीं तो नाग फुस् करी. तेव्हां ही गोष्ट त्यानें श्री दिनकरबुवा यांना सांगितली. त्यांनी ही

गोष्ट श्रीधर स्वामी यांचे कार्नी घातली. तेव्हां दोघेही आंग्लाईचें देवळांत गेले. दिनकरबुवास देवीवरील फुलें वगैरे काढण्यास सांगून स्वामींनी पूजा केली. नाग तसाच देवीचे डोक्यावर होता. त्याला श्रीधरस्वामी म्हणाले 'बाबा गुरवाचें चुकलें असेल त्याला माफी दे.' असें म्हणत पूजा संपविली व नंतर १ वाटी दूध देवी-पुढें ठेवून सर्व मंडळी बाहेर आलीं व पुन्हां दार उघडतात तों दूध पिऊन नाग नाहींसा झाला असें दिसून आलें.

## समर्थांचें दर्शन

सन १९५० साली ज्येष्ठ वद्य १३ श्रीमत् जगद्गुरू शंकराचार्य मठ पुरी, हे अगदीं पावसाळ्यांत गडावर आले होते. प्रथमतः ते थेट आंग्लाईचें देवळांत दर्शनास गेले. तेथें त्यास समर्थ दर्शन झालें. चेहऱ्याकडे नजर ठरेना तेव्हा अधोमुख दृष्टी करून विचारले "महाराज आपण कधी येणार" "तुझ्यासारखीं १०० माणसें तयार होतील तेव्हां येईन व समर्थ म्हणाले, तूं जें अजपाचें प्रसाराचें कार्य करीत आहेस तें कर तुला मी कांहीं सूचना देतो" त्या रात्रौ त्यांना स्वप्नात समर्थांनी कांहीं सूचना दिल्या.

## पेठेतील मारुती

देवीचें देवळांतून परत आले व मठाकडे जावयास निघाले म्हणजे उजवे हातास पेठेतील मारुती आहे. हा मारुती अनेकांना पावतो असें म्हणतात. यांचे समोरच श्री. श्रीधर स्वामींचे शिष्य मंडळींनीं सन १९५०–५१ मध्यें 'श्रीधर कुटी' या नांवाची इमारत बांधलेली आहे. जागा चांगली व प्रशस्त आहे.

मारुतीचें मागचें बाजूस पिण्याचें पाण्याचें तळें आहे. या तळ्यांत खालचें बाजूस ३ खण ३॥ खण लेणीसारखें आहे. यांचें

पाणी उत्तम व पाचक आहे. या तळ्याचें जीर्णोद्धाराचें काम श्री. गोवर्धनदास यानीच केलें.

### मठ

मुख्य रस्त्यानें सरळ गेले म्हणजे समोर मठ दिसतो. हा अत्यंत मोडकळीस आला होता. तो समर्थ सेवा मंडळानें १९५० व १९५१ या सालांत दुरुस्त केला आहे. याच मठांत शेजघर आहे. छत्रपती शिवाजी महाराज यानी हा बांधला व श्रीसमर्थ येथें रहावयास आले.

### शेज घर व आंतील वस्तू ( एका चित्रांत दिल्या आहेत )

शेजघरांत समर्थांचा पलंग आहे. हा पलंग श्रीशिवरायानी करून पाठविला व त्याचेवरील शेज ही पाठविली होती. या पलंगाचे खूर पितळेचे मूळचे आहेत. शेज वरचेवर बदलली जाते.

### तसबीर

पलंगावर तसबीर आहे. ही तसबीर तंजावर मठावर बसविलेले शिष्य भीम स्वामी यांनी समर्थास बघून काढलेली आहे. हें चित्र प्रत्यक्ष समर्थांना बघून काढलें असलेमुळें हेच अधिक विश्वसनीय व संग्राह्य चित्र होय. हें चित्र दुसरीकडे छापलें आहे. कोणासही दाढी लावावयाची व समर्थ म्हणावयाचे तें बरोबर नाहीं. पलंगाजवळ हंडा आहे या हंड्यातून नित्य कल्याण स्वामी श्रीसमर्थास उरमोडी नदीचें पाणी आणून देत असत.

### गुप्ती ( कुबडी )

ही गुप्ती ( कुबडी ) श्रीछत्रपतींनी २६० होन देऊन खरेदी केलेली आहे. ती समर्थांना त्यानीं दिली. समर्थांनी ती कुबडीत घातली. या खाकेंत धरणेचे कुबडीवरून समर्थांची उंची पांच फूट नऊ इंच असावी असा अंदाज आहे.

श्री समर्थ



श्री आक्काबाई वृंदावन



श्री वेणाबाई वृंदावन



### तांब्या-लोटा

हा तांब्या श्रीसमर्थ नेहमीं वापरत असत.

### पिकदाणी

खोकल्याची व्यथा जडल्यावर समर्थ विडा खाऊ लागले. तेव्हां थुंकण्यास ही पिकदाणी वापरीत.

### विड्याचे पानाचा डबा

या डब्यांत पानें ठेवली जात असत.

### काठी

ही वेताची काठी समर्थ नेहमीं वापरीत.

### फेटा

डोक्यास बांधणेचा फेटा मारुतीरायानी दिला. ( शेजघरांत आहे )

### वल्कले

हें वस्त्र झाडाच्या सालीचें आहे. समर्थ हें वापरीत असत. (शेजघरांत आहे)

### अग्निकुंड

शेजघरांत अग्निकुंड आहे. त्यांतील अंगारा समर्थांकडे येणाऱ्या दुःखित लोकांस समर्थ देत असत. आजही याच कुंडांतील अंगारा शनिवार-गुरुवारी घेण्याची प्रथा आहे. यानें अनेकांना गुण येतो.

### वेणाबाई-वृंदावन

श्रीवेणाबाईनीं शक १६०० च्या चैत्र वद्य १४ सह अमावास्येस देह ठेवला, त्याची हकिकत कौतुकास्पद आहे. त्यांनीं त्या दिवशीं कीर्तन केलें, कथासमाप्तीनंतर आरती झाली, गजर झाला,

वेणाबाईंनीं मंजुळ स्वरानें भजन केलें, श्रीसमर्थांपाशीं आल्या आणि

**वोपूनिं विणा तो सद्गुरुकरीं । वाहूनि मस्तकु पदाब्जावरी ।**
**प्राणज्योतीते काढुनि झडकरी । सद्रुहृदईं मिळविली ॥**

दासविश्रामधाम, १११, ९८.

गडावरील राममंदिराच्या वायव्य दिशेला वेणाबाईंच्या देहाला अग्नि-संस्कार झाला, त्या स्थानीं त्या काळीं चंपकवृक्ष निघाला होता. आज त्या जागीं श्रीवेणाबाईंचें समाधीवृंदावन आहे. (चित्र दुसरीकडे आहे)

## श्रीरामाच्या मूर्ती

पूर्वीं समर्थ तंजावरास गेले असतां एका अंध कारागिरास दृष्टी देऊन राम, सीता, लक्ष्मण, मारुती यांच्या मूर्ती तयार करणेंस सांगितले होते. समर्थांच्या आजारीपणातच त्या केशव निस्पृहही गडावर माघ वद्य ५ शक १६०६ रोजीं घेऊन आले. याच मध्यरात्रीं समर्थांनीं मूर्तींवरील मेण काढून दर्शन घेतले. आज याच मूर्ती गडावरील मुख्य देवळांत आहेत. [ चित्र दुसरीकडे आहे. ]

## कलमदान

समर्थांचे वडील सूर्याजीपंत हे **कुलकर्णी वतनाचें** काम करीत असताना टाक ठेवण्याचें एक कलमदान असें. हें कलमदान श्रीराममूर्तीपुढें ठेवलेलें ( वस्तुचित्र पहा ) असते.


## पादुका व कुबडी


श्री दत्तात्रेयानीं पादुका व कुबडी समर्थास माहुर मुक्कामीं दिल्या. या नेहमीं समाधी मागें असतात. (समर्थ वस्तुचित्र पहा )

## सोटा

एक वाकडी काठी आहे. हा सोटा गोरखनाथानी समर्थास दिला. हा समाधी मागे असतो. ( समर्थ वस्तुचित्र पहा )

श्री समर्थ समाधी





सभा मंडप

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ विः ........
क्रमांक ........ नोंः दिः ........

## ब्रह्मपिसा

गडावर जमलेल्या भोजनभाऊ शिष्यांची परीक्षा पाहणेंसाठीं कल्याणास चाफळास पाठवून एक दिवस अंगास शेंदूर फासून, मळवट भरून, तलवार घेऊन सर्वांवर समर्थ मारतो मारतो म्हणून धावले. सर्व घाबरले व पळाले. कल्याणास चाफळी निरोप गेला व ते आले. ते समर्थ कड्यावरून उडी टाकून कपारीत बसले होते तेथें थेट उडी टाकून गेले. त्यानाही समर्थ मारतो मारतो म्हणाले. ' मारा गुरुचे हातून मरण आले तर मोक्ष मिळेल.' कल्याणाची निष्ठा पाहून समर्थांनीं खरें रूप दाखविलें. या परीक्षेंत कल्याणच उतरला व त्यालाच येथून उपदेश देण्याचा अधिकार दिला. जेथून समर्थांनीं उडी मारली तेथें कट्टा केला आहे. ( चित्र दुसरीकडे आहे )

## कल्याणाची छाटीसाठीं उडी

श्रीसमर्थ ओवऱ्यांत रहात असता एकदा वावटळ सुटली तेव्हां वाऱ्यानें समर्थांची छाटी उडाली. तेव्हां समर्थ म्हणाले " कल्याणा छाटी उडाली बघ" हें ऐकताच कल्याणानी छाटी धरणेस कड्याचें खाली उडी मारली. जेथून उडी मारली तेथें कट्टा केला आहे.( चित्र पहा )

## अशोक वन

श्रीराममंदिरा समोरील अशोक वनांत पूर्वीं तळें होतें. तें गोवर्धनदासांनीं बुजवून अशोक वृक्ष लावले. तळ्यांतील मारुतीचेवर हल्लीं भिंतीत लहान मारुती ठेवला आहे.

## धाब्याचा मारुती

देवळाचे मागे नैऋत्येस श्रीशिवछत्रपती गडास तट बांधित असतां, समर्थांनी तट बांधू नको, हा मारुती स्थापन करतो तो सर्व रक्षण करील म्हणून मारुतीरायाची स्थापना केली. याला 'धाब्याचा मारुती' असें म्हणतात, ( चित्र दुसरीकडे आहे )


## अलिकडील १०० वर्षांतील दुरुस्त्या.

हल्लीचा सभामंडप व संगमरवरी फरशी, प्रदक्षणेच्या वाटेची फरशी व ओवऱ्या गोवर्धनदास यांनीं करविल्या. जुन्या सभा मंडपांतून आंग्लाइचे देऊळ व भांडारघर बांधलें. गोभक्त चौंडे बुवा वगैरे तर्फे सभामंडपावर पत्रे व २ ऱ्या दरवाजाचे जवळील बुरुज बांधला. मठापुढील फरशी समर्थभक्त शंकर श्रीकृष्ण देव यानी करविली. कै. बाबासाहेब देशपांडे यानी पुष्पवाटिका तयार केली व त्याची वाढ व जोपासना रामदासी मंडळीनीं केली. खंबाळे तळ्यांतील गाळ श्रीमंत वेलणकर यांचे पैशानी थोडासा काढला.

श्रीमंत अन्नपूर्णाबाई स्वामी [ बाईराजे ] यांचे अध्यक्षतेखालील समर्थ सेवा मंडळानें सन १९५०।५१ सालांत मठ, लक्कडखाना दुरुस्त करून पत्रे घातले. स्वतंत्रपणें वीज केंद्र तयार करून दिवे लावले. श्री. कोकणे यानीं दिलेली पवनचक्की उभी करून सुरू केली. सन १९५१ मध्यें मुंबई सरकारनें १००० रु. तळ्यांतील गाळासाठी दिले व गाळ काढला.

वेणाबाई वृंदावनाभोंवती फरशी केली. दासबोध वाचनाचे जागी श्री. टिकेकर यांचे साहायानें फरशी केली. गोविंदबुवा मराठे रामदासी यांचे सहाय्यानें शिखर दुरुस्ती व रंगरंगोटी केली. श्री. वणिकर यांचे मदतीनें कळसास सोन्याचा मुलामा दिला. खंबाळे तळ्यास पायऱ्या केल्या व श्री. जोशी व इतरांचे मदतीनें गजवडी वाटेंत 'कल्याण पायरी' व मुक्काम तळ्याजवळ व खंबाळे तळ्यास पायऱ्या केल्या. सतरंज्या, लोखंडी कपाटें वगैरे घेतली. समर्थ सेवेची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं, कै. गोवर्धनदास व श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांची तैल चित्रें चित्रकार श्री. पिंपळखरे व काळे यांचे मदतीनें तयार करून मंडपांत लावली. सर्वत्र रंगकाम केले. सेवामंडळ कचेरी बांधली.

धाब्याचा मारूती





शिखराचा सोनेरी कळस



समर्थ कलिजा

भगवा झेंडा





REFBK-0007796

योगीराज कल्याण

अनुक्रम 20808 वि.
206 नों: दि

## श्री समर्थ मठ



## श्री समर्थ वस्तु



मुद्रक:– आनंद प्रिंटिंग प्रेस सातारा लि.